नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२५ Issue - 325 | वार गुरुवार दि. १६ एप्रिल २०२६ Blow- Thursday Date 16 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## नांदेडच्या देगलुरमध्ये ४७ अंश तापमानाची नोंद

### सुंदगी हे देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरले; अकोला ४४ अंशावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात दिवसेंदिवस तापमानाचा पारा वाढत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. अनेक जिल्ह्यात तापमान ४० अंशाच्या पुढे गेलं आहे. त्यामुळं नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, आज अकोल्यात मोसमातील सर्वात जास्त तापमानाची नोंद झाली आहे. आज अकोल्यात ४४.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. तर नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातील सुंदगी या गावात ४७ अंश तापमानाची नोंद झाली आहे. त्यामुळं सुंदगी हे देशातील सर्वाधिक उष्ण शहर ठरलं आहे.

अकोल्यात आज या मोसमातील सर्वाधिक तापमानाची नोंद करण्यात आली आहे. अकोल्याचा आजचा पारा ४४. २ अंशांवर पोहोचलाय. अकोल्यात तापमानाचे दररोज नवनवे उच्चांक पाहायला मिळतायेत. परवा ४३.८, काल ४४ आणि आज तापमानाने ४४.२ चा टप्पा गाठलाय. दुपारच्या वेळी अकोल्याच्या रस्त्यांवर उन्हामुळे संचारबंदी सदृश्य परिस्थिती पहायला मिळती आहे. पुढचे काही दिवस अकोल्यात तापमानाचे अनेक नवे उच्चांक होण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवली जात आहे. सात दिवसात अकोल्याच्या तापमानात ५.५ अंशांची वाढ झाली आहे.



धुळे शहरासह जिल्ह्यात तापमानाचा पारा हा ४१ अंशावर जाऊन पोहोचल्याने कमालीची उष्णता वाढली असून यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. पुढील काही दिवसात तापमानाचा पारा अजून वाढणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. दरम्यान या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यकता असेल तरच घराबाहेर पडावे तसेच घराबाहेर पडताना टोपी रुमाल गॉगल यांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येत असून नागरिकांना उष्माघाताची लक्षणे दिसल्यास त्यांनी त्वरित जिल्हा शासकीय रुग्णालयात उष्माघात कक्षात उपचार घ्यावेत असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर रवी सोनवणे यांनी केले आहे.

अकोल्यात कमाल तापमान ४४अंश सेल्सिअसच्या पार गेले आहे. अकोल्यात आज तापमान ४४.२ अंश सेल्सिअस नोंदवलं आहे. सोबतच, अमरावतीत देखील तापमान ४४ अंश सेल्सिअस इतकी नोंद झाली आहे. यवतमाळमध्ये देखील पारा ४२.८ अंश, बुलढाणामध्ये तापमान ४२.८ अंश सेल्सिअस आहे. पूर्व विदर्भात देखील तापमान वाढले आहे. वर्ध्यात आज तापमान ४३.९ अंशांवर, नागपुरात तापमान ४३.४, चंद्रपूर आणि गडचिरोलीत तापमान ४२.६ अंश सेल्सिअस तर वर्ध्यात तापमान ४३.९ अंश सेल्सिअस झाले आहे.

### सीबीएसईकडून दहावीचा निकाल जाहीर

## ९३.७० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण, मुलींनी मारली बाजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे.

दरवर्षीप्रमाणं यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईनं अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही. मात्र, गुणवत्ता प्रमाणापत्र त्या त्या विषयात अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत. सीबीएसईनं दहावीचा निकाल जाहीर केल्यानं जवळपास २४ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली आहे. सीबीएसईच्या वेबसाईटवर अधिक विद्यार्थी भेट देत असल्यानं डिजीलॉकर आणि उमंग एपद्वारे विद्यार्थी तातडीनं निकाल डाऊनलोड करु शकतात. उमंग एपवरील निकालाची सर्वप्रथम सक्रीय करण्यात आली.



सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला असला तरीज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत अपयश आलं आहे. ते दुसऱ्या परीक्षेसाठी अर्ज दाखल करु शकतात. याशिवाय जे विद्यार्थी पहिल्या परीक्षेत मिळालेल्या गुणांमुळं समाधानी नाहीत ते १५ मेपासून सुरु होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज करु शकतात. सीबीएसईकडून लवकरच दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज मागवले जाणार आहेत. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार सीबीएसईनं दोन बोर्ड परीक्षा पद्धत आणली आहे.

सीबीएसईच्या विभागनिहाय निकालात त्रिवेंद्रम आणि विजयवाडा विभागानं बाजी मारली आहे. दोन्ही विभागांचा निकाल ९९.७९ टक्के लागला आहे. तर, नोएडा विभागाचा निकाल ८७.६६ टक्के तर दिल्ली विभागाचा निकाल ९७.३८ टक्के लागला आहे. केंद्रीय विद्यालयांचा निकाल ९९.५७ टक्के लागला असून जवाहर नवोदय विद्यालयांचा निकाल ९९.४२ टक्के निकाल लागला आहे. तर, सरकारी शाळांची टक्केवारी ९१.४३ टक्के आहे.

## राज्यातील पाच आयएएस अधिकाऱ्यांची बदली; सोलापूर जिल्हापरिषदेचे सीईओ कुलदीप जंगम यांची बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे सत्र अद्यापही सुरुच आहे. गेल्याच आठवड्यात काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या, तत्पूर्वी २५ अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश निघाले होते. त्यामध्ये, काही जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांची बदली झाली, तर काहींना सचिवपदी जबाबदारी मिळाली होती. आता, आणखी आयएएस ५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, सोलापूरच्या जिल्हा परिषदेचे साईओ कुलदीप जंगम यांची पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. बी. एन. पाटील (आयएएस: नॉन-एससीएस: २०१४), संचालक, पर्यटन, मुंबई यांची प्रकल्प संचालक, रुसा, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मुंबई येथे बदली झाली आहे. मंगेश जोशी (आयएएस: एससीएस: २०१५), उपमहासंचालक, यशदा, पुणे यांची संचालक, पर्यटन, मुंबई येथे बदली झाली आहे. यासह, सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम (आयएएस: आरआर: २०२०), यांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी येथे बदली करण्यात आली आहे. कुशल जैन (आयएएस: आरआर: २०२२), प्रकल्प अधिकारी, आयटीडीपी, अहेरी आणि सहायक जिल्हाधिकारी, अहेरी उपविभाग, गडचिरोली यांची मुख्य सोलापूर जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अधिकारी पदावर बदली करण्यात आली आहे. तर, रेवैया डोंगरे सहायक जिल्हाधिकारी, भूम उपविभाग, धाराशिव यांना यवतमाळ येथे प्रकल्प अधिकारी, खढउझ, पांढरकवडा आणि सहायक जिल्हाधिकारी, केळापूर उपविभाग म्हणून नियुक्ती देण्यात आली आहे.


## 'नारी शक्ती वंदन' विधेयक भारताचे भविष्य बदलेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मोदी सरकारने आणलेले 'नारी शक्ती वंदन' विधेयक देशाच्या लोकशाहीला नवे वळण देणारी 'वॉटरशेड मूव्हमेंट' ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी व्यक्त केला. या आरक्षणामुळे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीत महिला खासदारांची संख्या ३३ टक्क्यांवर मर्यादित न राहता, ती ४० टक्क्यांचा टप्पा ओलांडेल, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

> **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास; महिला खासदारांची संख्या ४० टक्के पार होणार**

दादर येथील योगी सभागृहात आयोजित 'नारी शक्ती वंदन महिला संमेलना'त मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अभिनेत्री पद्मश्री रवीना टंडन, वैशाली सामंत, प्राजक्ता माळी, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ, मुंबई भाजप अध्यक्ष



अमित साटम, माजी महापौर रितू तावडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, यापूर्वी दिवंगत पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि मनमोहन सिंग यांच्या काळातही आरक्षणाचे प्रयत्न झाले. मात्र, तत्कालीन घटक पक्षांचा विरोध आणि अन्य कारणांमुळे हे विधेयक प्रलंबित राहिले. पंतप्रधान मोदींनी मात्र 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'पासून सुरू केलेला प्रवास आता महिलांना संसदेत हक्काचे स्थान देण्यापर्यंत यशस्वीरीत्या पोहोचवला आहे.

जनगणना आणि मतदारसंघ पुनर्रचनेमुळे आरक्षण लांबणीवर पडेल, असा संभ्रम विरोधक पसरवत असल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला. ते म्हणाले की, २०११ च्या जनगणनेच्या आधारावरच ही प्रक्रिया राबवली जाणार असून २०२९ च्या निवडणुकीत लोकसभेत महिला खासदारांचा आकडा थेट २७३ वर पोहोचलेला दिसेल. सध्या जिथे आरक्षण नाही, तिथेही महिला स्वबळावर निवडून येत आहेत. त्यामुळे प्रत्यक्ष संसदेत महिलांचे प्रतिनिधित्व ४० टक्क्यांच्या पुढे जाईल.

प्रगत भारताचे शुभसंकेत : महाराष्ट्रात मुख्य सचिव, पोलीस महासंचालक, वन प्रमुख आणि मुंबई महापालिका आयुक्त यांसारख्या सर्वोच्च पदांवर महिलांची नियुक्ती ही आरक्षणामुळे नव्हे, तर त्यांच्या सक्षमतेमुळे झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षण असताना प्रत्यक्षात ५५ ते ५९ टक्के महिला निवडून येत आहेत. आता 'सरपंच पती' किंवा 'नगरसेविका पती' ही संकल्पना इतिहासजमा झाली असून महिला स्वतः खंबीर नेतृत्व करत आहेत. विद्यापीठांच्या पदवीदान समारंभात मुलीच सर्वाधिक सुवर्णपदके पटकावत आहेत, हे नव्या प्रगत भारताचे शुभसंकेत आहेत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

विरोधकांना दिला इशारा : काही लोक तांत्रिक कारणांचा आधार घेत छुप्या पद्धतीने या विधेयकाला विरोध करत आहेत, त्यांचा खरा चेहरा लवकरच जनतेसमोर येईल, असा इशारा फडणवीस यांनी दिला. या विधेयकासाठी आपण राज्यातील सर्व पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांना पत्र लिहून पाठिंब्याची विनंती केली असल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले. केवळ भाषणात नारी सशक्तीकरणाच्या गप्पा न मारता कृतीत आणण्याची हीच वेळ आहे, असे आवाहन त्यांनी केले.

### नियंत्रणासाठी व्यापक उपाययोजना; लसीकरण मोहिमेची प्रगती

## जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क; लसीकरण मोहिमेला वेग : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

जपानी मेंदूज्वराची वैशिष्ट्ये आणि धोका

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.

राज्यातील सद्यस्थिती

राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या



कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

लसीकरण मोहिमेची प्रगती

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुसऱ्या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्के पेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुसऱ्या डोसचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून आले आहे.

निदान व उपचार सुविधा

राज्यात जपानी मेंदूज्वराच्या निदानासाठी नागपूर, गडचिरोली, सेवाग्राम (वर्धा), भंडारा आणि गोंदिया येथे पाच सेंटीनेल केंद्रे कार्यरत आहेत. तसेच १६ जिल्ह्यांमध्ये बाल अतिदक्षता विभाग सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

विदर्भ भाग सर्वाधिक संवेदनशील

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार विदर्भ हा जपानी मेंदूज्वरासाठी सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. ग्रामीण व कृषी क्षेत्रात डासांची वाढ, तसेच डुक्कर व पक्ष्यांच्या संपर्कामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. काही शहरी व उपनगरी भागातही साथीचा धोका संभवतो.

नियंत्रणासाठी व्यापक उपाययोजना

राज्यात नियमित लसीकरण, विशेष मोहिमा, रक्त नमुना तपासणी, डास नियंत्रणासाठी धूरफवारणी, क्यूलेक्स डासांचे सर्वेक्षण, जनजागृती, डासांच्या उत्पत्तीस्थळांवर गप्पी मासे सोडणे तसेच स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत.

जनतेला आवाहन

जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## संपादकीय....

# मुलींनी मारली बाजी

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल ९३.७० टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल ९३.६६ टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोर्डानं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे. दरवर्षीप्रमाणं यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे. मुलांच्या तुलनेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलींची टक्केवारी अधिक आहे. सीबीएसईनं अधिकृतपणे टॉपर यादी जाहीर केली नाही. मात्र, गुणवत्ता प्रमाणपत्र त्या त्या विषयात अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दिली जाणार आहेत. सीबीएसईनं दहावीचा निकाल जाहीर केल्यानं जवळपास २४ लाख ७५ हजार विद्यार्थ्यांची प्रतीक्षा संपली आहे. सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला असला तरी ज्या विद्यार्थ्यांना या परीक्षेत अपयश आलं आहे. ते दुसऱ्या परीक्षेसाठी अर्ज दाखल करु शकतात. याशिवाय जे विद्यार्थी पहिल्या परीक्षेत मिळालेल्या गुणांमुळं समाधानी नाहीत ते १५ मेपासून सुरु होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज करु शकतात. सीबीएसईकडून लवकरच दुसऱ्या टप्प्यातील परीक्षेसाठी अर्ज मागवले जाणार आहेत. नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार सीबीएसईनं दोन बोर्ड परीक्षा पद्धत आणली आहे. सीबीएसईच्या विभागनिहाय निकालात त्रिवेंद्रम आणि विजयवाडा विभागानं बाजी मारली आहे. दोन्ही विभागांचा निकाल ९९.७९ टक्के लागला आहे. तर, नोएडा विभागाचा निकाल ८७.६६ टक्के तर दिल्ली विभागाचा निकाल ९७.३८ टक्के लागला आहे.

# गोंदियातील आंबेडकर जयंती उत्सव : आणि वैचारिक क्रेझ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

यंदा महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली. पण यावर्षीची जयंती ही नुसती जयंती नव्हती तर मनाला झालेला परिवर्तन होता असे म्हणता येईल. कारण गोंदिया शहरात आगळी-वेगळी जयंती साजरी केलेली पाहायला मिळाली आहे. जणू हा एक मोठा उत्सव साजरा केल्याचा अनूभव आला. तसेच काही ठिकाणी दिल्ली पासून तर पंचक्रोशीतील प्रबोधनकारांची विचारसरणी पेरुन वैचारिक प्रबोधनाची क्रेझ झळकवली.

गोंदिया दि. १० एप्रिल पासून राष्ट्रपिता महात्मा फुले व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीचा सोहळा हा मोठ्या आनंदाने तसेच कौतुकाने उत्साहीत स्वरुपात साजरा करण्याचे अनेक ठिकाणी पाहण्यात आले. याची सुरुवात तर मैत्रेय बुद्ध विहार भीमनगर येथून करण्यात आली. या भीमनगर मैदानाची तर वैचारिक किमया अफाट आहे. या ठिकाणी भारतातील व महाराष्ट्रातील अनेक प्रबोधनासाठी विचारवंत, साहित्यिक, मातब्बर कवी, जेष्ठ





पत्रकार यांनी अनेक वर्षानुवर्षापासून तर आजतागायत ही परंपरेची नांदी सुरुच आहे. हा वसा मौलिक विचार देणारा व पेरणारा आहे.

याठिकाणी १४ एप्रिल रात्री १२.०१ मिनीटांनी झालेली फटाक्यांची आतीशबाजी भयानक आवाजांनी गोंदिया नागरिकांची झोप उडविणारी असते. हा उत्सव आहे महामानवाच्या जन्माचा त्यांच्या कार्याचा व विचारांचा पडलेल्या प्रभावाचा आहे. तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयस्तंभ येथील प्रतिमेजवळ तर अतिशय मोठ्या प्रमाणात बौध्द व आंबेडकरवादी जनता एकत्र येऊन आपली वैचारिक व महोत्सवाची मोठी ताकद दाखविते. याठिकाणी असंख्य फटाक्यांच्या आवाजाने शहर दुमदुमून गेले. तसेच वैचारिक प्रबोधनाची मुहूर्त मेढ रोवून मनामनात बाबासाहेब आंबेडकर यांच्या जाणिवा पोहचविल्या जातात. मग रामनगर, फुलचूरपेठ, नंगपुरामुर्री, गौतम नगर याठिकाणी वैचारिक उत्सव साजरा करण्यात आला.

ओबीसी, सिंधी, मारवाडी गल्लीतही आंबेडकरवादी विचारांची पेरणी

यंदा विशेष बाब म्हणजे यावर्षी ओबीसी समाजातील अनेक लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, नोकरवर तसेच सामान्य जनता आणि सिंधी मारवाडी कालोनीमध्ये सुध्दा डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या गल्लीत पोहोचले असून सहभागी होऊन नाश्ता, फळे, जूश, मसाला भात कळी, मठ्ठा,




पुस्तकांची वाटप करण्यात आले.

जागर समतेचा- महामानवाच्या जयंतीचा

जयंतीच्या एक दिवसाच्या आधी तर शहराभर ग्रामीण भागापासून बाईक रॅली काढून समतेचा जागर करून स्वातंत्र्य, समानता, बंधुता व एकात्मता यांचा संदेश देण्यात आला. हा उत्सव म्हणून होणाच पण वैचारिक सन्मान सुध्दा यामधून दिसून आले. दुपारी ०३.०० वाजतापासून महामानवांचे विचार घराघरात सुमधुर गीतांनी, डीजेच्या झगमगाटात ठुमक्यांनी, ठेक्यांनी तरुणाईने धुमाकूळ माजवला होता. तर महीला वर्ग समुहाच्या घोळक्याने गोंदिया शहरातील आकाश निळा निळा होऊन पांढरा शुभ्र वस्त्रांनी जनता ही चमकत होती.

अशाप्रकारे दरवर्षी जयंती सोहळा हा उत्सव आणि वैचारिक प्रबोधनातून जर झाला तर माणूस हा माणसाला माणुसकीची वागणूक देईल असे चित्र स्पष्ट होईल. बाबासाहेब आंबेडकरांनी जे काही केले ते समग्र मानवी घटकांसाठी केले. कोणताही भेद न करता भवतू सब्ब मंगलम सर्वांचे कल्याण साधण्यासाठी उभे आयुष्य लढले. अशा माणसाला माणूस म्हणून जगण्याचे नवे सम्यक जीवन दिले अशा बाप माणसाला, महामानवाला ह्या जयंती निमित्ताने अभिवादन करतो.

जयभीम... जय संविधान....!



(लेखक आंबेडकरवादी साहित्याचे अभ्यासक आहेत.

चंद्रशेखर वार्ड, गोंदिया.

संवाद : ९७६४६७६४९९

**- मुन्नाभाई नंदागवळी**

# महात्मा फुले पुतळा कृती समितीच्या वतीने कळंब शहरात फुले जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे,ता ११ कळंब शहरातील महात्मा फुले पुतळा कृती समितीच्या वतीने तहसील कार्यालया समोरील महात्मा फुले चौक येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुलेंच्या १९९ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

पर्याय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय श्री विश्वनाथ अण्णा तोडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आढळा येथील उपक्रमशील शिक्षक व सुप्रसिद्ध व्याख्याते श्री महादेव खराटे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त महाराष्ट्र सरकार आणि केंद्र सरकार पुढील वर्षभर विविध उपक्रम राबवनार असुन महात्मा फुले यांचे विचार तळागाळातील व्यक्तीपर्यंत पोहोचविन्या साठी प्रयत्न करणार आहे. महात्मा फुले हे बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. प्रत्येक उपदेशाची सुरुवात त्यांनी स्वतःपासून केली असल्याचे प्रतिपादन श्री विश्वनाथ अण्णा तोडकर यांनी केले. व्याख्याते श्री महादेव खराटे यांनी सांगितले की इतक्या कठिण परिस्थितीत महात्मा फुले यांनी जे कार्य केले त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. ते केवळ समाजसुधारकच नव्हते तर शेती, बेरोजगारी, आरोग्य, बांधकाम, कामगार आशा विविध क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. यावेळी पत्रकार माधवसिंग राजपूत,युवक संतोष यादव, निवृत्त मुख्याध्यापक श्री सी आर घाडगे, विलास करंजकर , समाजसेवक सचिन क्षीरसागर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास पुतळा कृती समितीचे अध्यक्ष श्री टी जी माळी यांच्या सह सर्वश्री डॉ राजेंद्र गोरे, प्रा, आर एस माळी, प्रा राजेंद्र खडबडे, सी एन यादव, बिभीषण यादव, बाबासाहेब राऊत, शहाजी राऊत, जयपाल शिंदे, सूर्यकांत मुळे, सिद्धेश्वर सातव, श्रावण मेहेत्रे, उप शिक्षण अधिकारी संतोष माळी, पत्रकार माधवसिंग राजपूत, सामाजिक कार्यकर्ते सचिन क्षीरसागर,राजेंद्र बिक्कड,मुख्याध्यापक सुरेश टेकाळे,डॉ अशोक शिंपले, प्रेम गोरे, अशोक चिंचकर, निलेश पांचाळ, सावता माळी, बाळासाहेब माळी, बिभीषण माळी, बाबा माळी, गोरख टाचतोडे, डॉ अशोक माळी, धीरज दुधाळ, शहाजी चव्हाण, दत्ता माळी,भारत करंजकर,सचिन गायकवाड, शुभांगी माळी, सरोजा खडबडे, जयश्री माळी, स्वाती शिंपले, मनिषा यादव, शिवानी माळी हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महात्मा फुले पुतळा कृती समितीचे सचिव तथा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाचे राज्य सरचिटणीस संतोष भोजने यांनी तर आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर तोडकर यांनी केले.

# प्रचंड अभ्यास करून महात्मा फुल्यांसारखे समाज क्रांतीकारक बनावे



## डॉ. रुपेशकुमार राऊत यांचे प्रतिपादन : नंगपूरामुर्री शा. नि. शाळेत महात्मा फुले जयंती साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गोंदिया : सद्याची परिस्थिती पाहून माणसाने पुढचे पाऊल उचलावे. कारण जग हे तंत्रज्ञानाचे असूनही नको त्या मार्गाने जाते. सामाजिक वसा जोपासावा. अंधश्रद्धा यावर मात करून सर्व घटकांनी ज्ञानी व्हावे. संबध क्षेत्रात काम करुन शिक्षणाने मोठे होता येते. असे महात्मा फुले सांगायचे. म्हणून विद्यार्थ्यांनी प्रचंड अभ्यास करून महात्मा फुल्यांसारखे क्रांतीकारक बनावे. असे प्रतिपादन जिल्हा सहाय्यक नियोजन अधिकारी डॉ. रुपेशकुमार राऊत यांनी केले. ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी मंचावर नीता भलमे यांच्या अध्यक्षतेखाली पी ए लांजेवार, साधना पारधी, आशिष शहारे, कार्तिक शहारे, दीक्षा तुरकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रपिता महात्मा फुले व सावित्रीबाई फुले तसेच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. सदर कार्यक्रम अनुसूचित जाती व नवबौद्ध शासकीय निवासी शाळा नंगपूरामुर्री येथे दुपारी १२.०० पार पडला.

श्री. राऊत पूढे म्हणाले- आपल्या अभ्यास करूनच जीवनाचे यश मिळविता येईल. अन्यथा मार्ग बंद झाल्याचे संकेत देशात दिसत आहेत. म्हणून अभ्यास करून आपण जिंकु शकतो. कार्यक्रमाचे संचालन प्रदीप ढवळे यांनी केले असून आभार मुन्नाभाई नंदागवळी यांनी मानले. यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी सहकार्य केले.




# डॉ. आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय : प्राचार्य भामरे

## घोटी येथील जनता विद्यालयात डॉ. आंबेडकर यांना अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : घोटी येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे होते. व्यासपीठावर उपमुख्याध्यापक उल्हास पवार, पर्यवेक्षक हिरामण चौधरी, ज्येष्ठ शिक्षक निवृत्ती सरगर, चारुशिला तगडे, अपर्णा उईके, हेमंत झोले, संपत शेंगाळ, तृप्ती थोरात आदी उपस्थित होते. उपस्थितींच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्याचा परिचय उपशिक्षक रमेश देवगिरे,सोनाली वाघ यांनी करून दिला.

यावेळी बोलतांना विद्यालयाचे प्राचार्य नितीन भामरे म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यता निर्मूलनासाठी आयुष्यभर कार्य केले.. भारतीय राज्यघटना तयार करण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले म्हणून त्यांना भारतीय घटनेचे शिल्पकार असे म्हटले जाते. जातीयभेद,सामाजिक विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले . डॉ आंबेडकर यांचे विविध क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे म्हणून डॉ. आंबेडकर यांचा कार्याचा आदर्श यावा असे आव्हान प्राचार्य भामरे यांनी शेवटी केले. सूत्रसंचालन रमेश देवगिरे यांनी तर आभार गायत्री सूर्यवंशी यांनी मानले. यावेळी सोमनाथ गिरी, कैलास पाचोरे, सुधीर काळे,सत्येन जाधव, रुपाली चौधरी, मनिषा सोनवणे, अलका राठोड, प्रकाश तांबे, मंगेश कासार वरिष्ठ लिपिक जीवन शिंदे, अनिल गोवर्धने आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम

## खुल्या गटातून पोलीस भरतीमध्ये सोलापूर जिल्ह्यात प्रथम

# चळे ची पहिली महिला पोलिस कु. प्रियंका वाघमारे सह आदर्श पालक- शिक्षक यांचा जि.प. केंद्र शाळेत सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चळे/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील चळे येथील कु. प्रियंका शालन राहुल वाघमारे हिने नवी मुंबई पोलीस भरती मध्ये उज्वल यश संपादन केले असून तिने खुल्या गटातून पोलीस भरतीमध्ये सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाली असून चळे गावातूनही पहिली महिला पोलीस ठरलेली प्रियंका वाघमारे हिचा जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेच्या वतीने बचत गट व्यवस्थान ग्राम संघाच्या अधक्ष्या सौ पूनम मोरे यांच्या हस्ते नुकताच सत्कार करण्यात आला तिच्या या यशाबद्दल सर्व चळे ग्रामस्थातून, ग्रामपंचायतीकडून, विविध शैक्षणिक संस्था मधून अभिनंदनचा वर्षाव होत आहे. त्याचबरोबर अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलीला या यशापर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाचा वाटा उचलल्याबद्दल आई - वडील सौ शालन व श्री राहुल वाघमारे यांचाही यावेळी शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. नूतन पोलीस प्रियंका वाघमारे यांनी नवोदिताना अवाहन करताना उचित ध्येय... अपार मेहनत व आई-वडिलांचा कष्टाला... सामोरे ठेवून प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल आयुष्य घडवलं पाहिजे, यश मिळवलं पाहिजे माझे यश हे पूर्णपणे माझ्या आई-वडिलांना व शाळेला समर्पित करत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी व युवक वर्गाने आपल्या ध्येयपूर्ती कडे जाताना अतिशय प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे नमूद केले व इच्छुकांना मार्गदर्शन करण्याची तयारी दर्शवली. यावेळी सिद्धनाथ वाचनालयाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे व संत गाडगेबाबा यांची विचारधारा हे पुस्तक देऊन यशस्वीतेचा सन्मान करण्यात आला.

त्याचबरोबर चळे केंद्रातून आदर्श शिक्षक प्राप्त झाल्याबद्दल श्री दरिबा कोळी ( आंबे जि.प. शाळा) व श्री लहानु पवार( जि.प. गवळी वस्ती- शाळा चळे) या शिक्षकांचा ही यावेळी सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्याध्यापक प्रभाकर घाडगे, शिक्षण तज्ञ सदस्य अतुल मोरे यांनी आपल्या मनोगतातून सर्वच सत्कारमूर्तींनी आपल्या परिश्रमातून मिळवलेले यश हे इतरांसाठी प्रेरणादायी ठरले आहे असेच मार्गक्रमण करत राहून यशाच्या अधिक उंचीवर पोहचावे अशा अपेक्षा व्यक्त केल्या. शाळा व्यवस्थापन समिती आजी-माजी अध्यक्ष अतुल सटाले, नेताजी गायकवाड, सज्जन मोरे , सहशिक्षक शशिकांत कांबळे, संभाजी माने, विजय चंदनशिवे, राजेंद्र भोसले, आनिता शिंदे, ज्योती चंदनशिवे, प्राजक्ता वाघमारे, छाया मसलखांब सतीश बुवा, दत्तात्रय कांबळे, अण्णासाहेब रायजादे उपस्थित होते. हा कार्यक्रम क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची द्विशताब्दी जयंती प्रारंभ व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आला होता.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमिवर जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी केली विविध ठिकाणची पाहणी

## वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (६५ एकर), दर्शन रांग, दर्शन मंडप व नदी पात्राची केली पाहणी; विविध सूचनांचे दिले निर्देश








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. वारी कालावधीत येणा-या वारकरी भाविकांना अधिकच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी विविध ठिकाणची पाहणी केली

यावेळी त्यांनी वाखरी पालखी तळावर पालखी सोहळे तसेच वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांची माहिती घेतली. यामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा, पाणीपुरवठा, स्वच्छता, आपत्कालीन कक्ष, विद्युत व्यवस्था, शौचालय आदी बाबतची माहिती घेऊन सूचना केल्या. तसेच भक्ती सागर येथे वारकरी भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती घेतली.वारी कालावधीत गर्दी वर नियंत्रण ठेवण्यासाठी वाखरी येथे वॉच टॉवर उभे करावेत तसेच भक्ती सागर (६५ एकर) येथे हायमास्टची संख्या वाढवावी, तसेच पायाभूत सुविधा सहज आणि सोप्या पद्धतीने भक्तांना मिळाव्यात. याबाबतच्या महत्त्वपूर्ण अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे , उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, , जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधधिक्षक डॉ. सरडे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने,तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (६५ एकर), नदीपात्र या ठिकाणी प्रशासनाकडून भाविकांना देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे व मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली. तसेच मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी आषाढी यात्रा कालावधीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने असल्याने मंदिर समितीकडून दर्शन रांगेत विश्रांती कक्ष स्थापन करण्यात येतात तसेच दर्शन रांगेतील भाविकांचे दर्शन जलद व सुलभ व्हावे यासाठी करण्यात येणारे नियोजनाची तसेच देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली त्याचबरोबर प्रस्तावित दर्शन मंडप बाबतची माहिती त्यांनी यावेळी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व संवर्धनाचे कामे पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, सदर कामाची पाहणी कार्तिकेयन एस. यांनी केली.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी वाखरी पालखी तळ, विसावा मंदिर, भक्ती सागर (६५ एकर), रिद्धी सिद्धी दर्शन मंडप, दर्शन रांग, स्काय वॉक, चंद्रभागा वाळवंट, ज्ञानेश्वर दर्शन मंडप तसेच मंदिर व मंदिर परिसराची पाहणी केली.

# अण्णासाहेब पाटील महामंडळातील जाचक अटींमुळे मराठा तरुण आर्थिक कोंडीत; अखिल भारतीय मराठा महासंघाचा जिल्हाधिकारी कार्यालयावर एल्गार करण्याचा इशारा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून लादण्यात आलेल्या जाचक अटी, निधीची कमतरता आणि रखडलेला व्याज परतावा यामुळे मराठा समाजातील नवउद्योजक तरुणांची मोठी आर्थिक कोंडी होत आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे या तरुणांच्या स्वप्नांचा गळा घोटला जात असल्याचा आरोप करत, अखिल भारतीय मराठा महासंघ सोलापूर जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी यांना अत्यंत तीव्र निवेदनाद्वारे इशारा देण्यात आला. अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली सादर करण्यात आलेल्या या निवेदनात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर कडक ताशेरे ओढण्यात आले. निवेदनातील प्रमुख मागण्या आणि मुद्दे:--

१) ङजख मंजूरितील दिरंगाई: महामंडळाच्या नियमानुसार पंधरा दिवसांची मुदत असताना हेतू पुरस्सर विलंब लावून मुदत संपल्यावर मंजुरी दिली जाते. ज्यामुळे बँकांमध्ये कागदपत्रे सादर करणे अशक्य होते.

२) जाचक अटिंचा पाऊस:- महिला उद्योजकांसाठी ड्रायव्हिंग लायसन्सची सक्ती ७/१२ व ८/- अ उताऱ्याची अट आणि वाहन कर्ज बंद करण्याचा निर्णय हे मराठा तरुणांना मागे खेचणारे आहेत.

३) भेदभावाची वागणूक:- इतर महामंडळाच्या कर्ज प्रक्रिया सुटसुटीत असताना केवळ अण्णासाहेब पाटील महामंडळासाठीच 'उत्पन्नाच्या तीन पट कर्ज' यांसारखे जाचक नियम का? असा सवाल विचारण्यात आला आहे.

४) शाळा सोडल्याचा दाखला:- वयाचा पूरवा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला (डउ) कोणत्याही अटीशिवाय सर्व स्तरावर ग्राह्य धरला पाहिजे.

५) व्यवस्थापकीय संचालकांची बदली:- सध्याचे व्यवस्थापकीय संचालक (चऊ) हे जाणीवपूर्वक लाभार्थ्यांची अडवणूक करत असून त्यांची तत्काळ बदली करण्याची मागणी करण्यात आली आहे. आंदोलनाचा इशारा मराठा: तरुणांच्या संयमाचा अंत पाहू नका? असा इशारा महासंघाने दिला आहे; जर येत्या ७ दिवसांत या सर्व जाचक अटी रद्द केल्या नाहीत आणि रखडलेला व्याज परतावा जमा केला नाही; तर सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा आणि एल्गार पुकारला जाईल, असा सज्जड दम अर्जुनराव चव्हाण यांनी दिला आहे.

या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनाही माहितीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. यावेळी जिल्हाध्यक्ष अर्जुनराव चव्हाण, सचिन गंगथडे जिल्हा उपाध्यक्ष, गुरुदास गुटाळ जिल्हा सचिव, शिवाजी मोरे युवक जिल्हाध्यक्ष, हनुमंत कदम विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष, सचिन डोरले तालुका अध्यक्ष मंगळवेढा, अमोल सातपुते शहराध्यक्ष मंगळवेढा, अमोल पवार शहराध्यक्ष, शुभम ताटे युवक शहराध्यक्ष, शामराव साळुंखे शहर उपाध्यक्ष, पांडुरंग शिंदे शहर संघटक, नागेश गायकवाड शहर रिक्षा संघटना अध्यक्ष, नानासो शिंदे व्यापार व उद्योग आघाडी अध्यक्ष, शंकर गोवे, अजित लेंडवे, मालोजी शेंबडे, रोहित जाधव, इ. कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# निफाडला श्री मानकेश्वर वाचनालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील श्री मानकेश्व वाचनालयात १३५ वी जयंती वाचनालयाच्या सभागृहात उत्साहात साजरी करण्यात आली. वाचनालयाचे संचालक डॉ. महेश बनकर यांच्या शुभहस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकर बाबुराव शेलार व संचालक डॉ.महेश बनकर यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर मनोगत व्यक्त केले.

या प्रसंगी वाचनालयाच्या उपाध्यक्ष डॉ.मेघा जंगम हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर संचालक सुहास सुरळीकर सर,सुनील चिखले, अशोक पगारे, राजेश लोखंडे, वाचक अनुरूप कुंभार्डे, वाचनालयाची ग्रंथपाल नितीन बनसोडे, सहाय्यक ग्रंथपाल आरती जंगम, लेखनिक नंदकुमार पुंड, शिपाई अनिता इस्ते आधी उपस्थित होते.

# वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे हीच डॉ. बाबासाहेबांना आदरांजली : प्रा. डॉ. देशमुख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




### ओझर महाविद्यालयात जयंती निमित्त परिसंवाद

निफाड/प्रतिनिधी : महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांनी शिक्षणाच्या माध्यमातून समाजात क्रांती घडवून आणली .मात्र आज पदव्या घेतलेले शिक्षित लोकही बाबा बुवांच्या चरणी लीन होतात.त्यातूनच खरात सारख्या प्रवृत्ती निर्माण होतात.त्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली ठरेल.असे प्रतिपादन मविप्र शिक्षणाधिकारी प्राचार्य डॉ.विलासराव देशमुख यांनी ओझर महाविद्यालयात केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने आयोजित डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या विषयावर आयोजित परिसंवादात प्रमुख वक्ते म्हणून डॉ.देशमुख बोलत होते . अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. डी.लोखंडे होते. तर मंचावर उपप्राचार्य प्रा एस के आवारे,डॉ. डी. एस बोराडे, डॉ आशा कदम,डॉ एम डी दुगजे, प्रा बी टी शिंदे,डॉ. संध्या सरदार ,डॉ नारायण पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणात प्राचार्य डॉ. देशमुख यांनी आजचा समाज विज्ञान दृष्टी व सत्यशोधक विचारांपासून दूर जात आहे. हे विविध उदाहरणावरून पटवून दिले. परीसंवादात डॉ.डी एस गोडगे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या रूपाने लोकशाहीचा पाया भक्कम केला. असे सांगितले महाविद्यालयात जयंती निमित्ताने संविधान उद्देशिका लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, अठरा तास अभ्यास अभियान इत्यादी उपक्रम संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक व उपप्राचार्य डॉ.एस बोराडे यांनी केले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ए टी टरले यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विविध पर्यायांविषयी आणि संरक्षण क्षेत्रातील करिअरविषयी विशेष मार्गदर्शन

# एमआयटीमध्ये करिअर मार्गदर्शन आणि एनडीए तयारी व प्रशिक्षण अनावरण समारंभ उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : वाखरी येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल कॅम्पसमध्ये एमआयटी ज्युनिअर कॉलेजच्या एनडीए परीक्षा तयारी आणि प्रशिक्षण कार्यक्रमाचा अनावरण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी आयोजित दहावीनंतरचे करिअर विषयक चर्चासत्रात प्रसिद्ध शिक्षणतज्ञ व करिअर मार्गदर्शक विवेक वेलणकर व कर्नल डी. के. उपाध्याय यांनी करिअरच्या विविध पर्यायांविषयी आणि संरक्षण क्षेत्रातील करिअरविषयी विशेष मार्गदर्शन केले. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना योग्य करिअरची दिशा मिळावी तसेच देशसेवेबरोबरच संरक्षण क्षेत्रातील उच्च करिअरच्या संधी याविषयी आवश्यक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे विवेक वेलणकर, वाखरी येथील एमआयटी शैक्षणिक संकुलाचे सहसंचालक कर्नल डी. के. उपाध्याय, विश्वशांती गुरुकुलचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी, ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डॉ. स्वप्नील शेठ, हेडमिस्ट्रेस शिबानी बॅनर्जी व ज्युनिअर कॉलेजचे ग्रुप मार्केटिंग व्यवस्थापक योगेश नागपाल उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वप्नील शेठ यांनी केले. यावेळी त्यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात करिअर निवडताना तज्ज्ञ मार्गदर्शनाचे महत्त्व अधोरेखित करत कार्यक्रमाचे उद्दिष्ट स्पष्ट केले. एमआयटी ज्युनिअर कॉलेजमध्ये सुरु झालेल्या एनडीए परीक्षा तयारी आणि प्रशिक्षणामुळे पंढरपूर, सोलापूर आणि आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांना संरक्षण क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर कर्नल डी. के. उपाध्याय यांनी संरक्षण दलातील आर्मी, नेव्ही व एअरफोर्स अशा तिन्ही विभागातील करिअर संधी आणि देशसेवेबरोबरच मिळणाऱ्या सुविधा व मानसन्मान याविषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी छऊ मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आवश्यक असलेली शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक तयारी आणि नेतृत्वगुण यांचा विशेष उल्लेख केला. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये संरक्षण क्षेत्राबद्दल आकर्षण अधिक दृढ झाले.

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते विवेक वेलणकर यांनी विद्यार्थ्यांना करिअर निवडताना केवळ पारंपरिक पर्यायांचा विचार न करता आपल्या आवडी, क्षमता, कौशल्ये आणि बदलत्या काळाच्या गरजा लक्षात घेऊन करिअर निवडण्याचा सल्ला दिला. यावेळी त्यांनी छऊ प्रवेश प्रक्रिया, लेखी परीक्षा, डडइ मुलाखत आणि प्रशिक्षण याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पुढे बोलताना ते म्हणाले 'जर आपल्यामध्ये शिस्त, आत्मविश्वास, कठोर परिश्रम करण्याची तयारी असेल तर तुम्ही कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होऊ शकता.' यावेळी त्यांनी अभियांत्रिकी, वैद्यकीय, संरक्षण, विविध प्रवेश आणि स्पर्धा परीक्षांची तयारी विषयी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी व पालकांनी उपस्थित केलेल्या करिअरविषयक विविध प्रश्नांची उत्तरे त्यांनी संवादात्मक सत्रात दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राची बिडवे यांनी केले, नारायण देशपांडे व तानाजी डुबल यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली तर वीरेंद्र बावस्कर यांनी आभार प्रदर्शन केले.

# निफाडला दि.१७ एप्रिल रोजी विराट हिंदू संमेलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



### ह भ प संग्रामबापु भंडारी, यांचे व्याख्यान

निफाड/प्रतिनिधी : संत जनार्दन स्वामी पर्णकुटी कोळवाडी रोड निफाड येथे दिनांक१७ एप्रिल २०२६ रोजी रात्री आठ ते दहा या वेळेत सकल हिंदू समाज यांचे वतीने विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून याप्रसंगी समाज प्रबोधनकार ह भ प संग्राम बापू भंडारी यांचे जाहीर व्याख्यान होणार आहे याप्रसंगी ॲडव्होकेट विजया जगताप तसेच साधुसंत महात्मे गण यांची विशेष उपस्थिती राहणार आहे , या प्रसंगी निफाड कुंदेवाडी ,श्रीरामनगर ,रसलपुर, सोनेवाडी ,आदी गावातील सकल हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे यावेळी कार्यक्रमानंतर सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने उपस्थितांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार असून संमेलनात आपण पारंपारिक वेशभूषित हजर राहून या संमेलनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आव्हान यावेळी सकल हिंदू समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे,

# पालखी सोहळ्यात वारकरी भाविकांना आवश्यक सुविधा देण्याससोबतच रस्ते दुरुस्ती, स्वच्छतेला प्राधान्य

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.; आषाढी यात्रेच्या पुर्व तयारीच्या आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना केले मार्गदर्शन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै २०२६ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी श्री ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम पालखी सोहळ्याबरोबर तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. या कालावधीत वारकरी भाविकांना पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा आणि रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पाणी, आरोग्य, सुरक्षा, उपलब्ध करून देण्याबरोबरच रस्ते दुरुस्ती, शौचालय सुविधा व स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य देणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांनी दिली.

आषाढी यात्रेच्या पुर्व तयारीच्या अनुषंगाने श्री विठ्ठल रुक्मिणी भक्त निवास येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे , उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, , जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, गटविकास अधिकारी अमोल जाधव, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, वैद्यकीय अधधिक्षक डॉ. सरडे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वहाने, व्यवस्थापक प्रविणकुमार घम तसेच संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस म्हणाले, पालखी सोहळा आणि सर्व भाविकांचा प्रवास सुखकर होण्यासाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची वारीपूर्वी दुरूस्ती करावी. यासाठी सार्वजनीक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांनी आवश्यक तात्काळ पाहणी करुन रस्ते दुरुस्ती बाबतची कार्यवाही करावी. पालखी मार्ग, पालखीतळ, विसावा याठिकाणी भाविकांना पुरेशा शौचालय सुविधा व मुबलक पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन करावे. स्वच्छतेसाठी अधिकचे मनुष्यबळ व आवश्यक यंत्रणाची उपलब्धतेबाबत नियोजन करावे. अन्न औषध प्रशानाने पालखी मार्गावरील तसेच शहरातील व परिसरातील खाद्य पदार्थांच्या दुकानांची तपासणी करावी. तसेच पदार्थांची तपासणी करुन तात्काळ अवहाल प्राप्तीसाठी फुड सेफ्टी ऑन व्हील या मोबाईल व्हॅनची संख्या वाढवण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच भेसळ व विषबाधा होऊ नये यासाठी जनजागृती करण्याचे नियोजन करावे.

तसेच सुरक्षेसाठी वाखरी, भक्ती सागर (६५ एकर) , वाळवंट, दर्शन मंडप, दर्शन रांग, मंदीर व परिसर, प्रमुख रस्ते ठिकाणी सीसीटीव्ही कार्यान्वित करुन एकाच ठिकाणी ऑपरेटींग सिस्टीम करण्याबात नियोजन करावे. वारी कालावधीत खाजगी हॉस्पिटलचे दहा टक्के बेड रिकामे ठेवण्याबात आरोग्य विभागाने आवश्यक कार्यवाही करावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी दिल्या.

यावेळी प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी आषाढी यात्रेत प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नियोजनाबाबतची सविस्तर माहिती पीपीटीद्वारे दिली यामध्ये पालखी सोहळे येण्याचे मार्ग मुक्कामाचे व विसाव्याचे ठिकाण व त्या ठिकाणी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा बाबतची माहिती दिली. तसेच वाखरी पालखी तळ, भक्ती सागर (६५ एकर) वाळवंट, दर्शन रांग, दर्शन मंडप येथे प्रशासन व मंदिर समितीकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली.

---

## सुपतगाव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवाचा उत्साह, कार्यक्रमांचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा /प्रतिनिधी : उमरगा तालुक्यातील सुपतगांव येथील भिम नगर भागात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सार्वजनिक जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंगळवारी, १४ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

प्रतिमा पूजन आणि उपस्थिती

याप्रसंगी हणमंत भालेराव, उत्तम भालेराव, महावीर भालेराव, राम भालेराव, किशोर भालेराव, वसंत कांबळे, दादा महादेव कुंभार, विक्रम कांबळे, ज्ञानदेव भालेराव, रोशन भालेराव आणि गौतम कांबळे




यांच्यासह जयंती उत्सव समितीचे सर्व सदस्य आणि गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्य जयंती दिनानिमित्त अभिवादन केल्यानंतर, समितीच्या वतीने आगामी कार्यक्रमांची घोषणा करण्यात आली आहे:

२७ एप्रिल रोजी सुप्रसिद्ध भीम गीतांचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

२८ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची संपूर्ण गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीचे मुख्य आकर्षण लेझीम पथक असणार आहे.

गावातील एकोपा वाढवण्यासाठी आणि महामानवाचे विचार घरा-घरात पोहोचवण्यासाठी या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, असे समितीच्या सदस्यांनी यावेळी सांगितले.

## ग्रामपंचायत बबलाद येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर १३५ व्या जयंती उत्सवाने साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधानी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील बबलाद ग्रामपंचायत येते डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सवने साजरा करण्यात आले प्रारंबी बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन डॉक्टर टिप्पण देगाव यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी सरपंच अंबिका निरगुडे, ग्रामसेविका मॅडम वाघमोडे, सामाजिक कार्यकर्ता युवा नेता बाबुराव निरगुडे, बसवराज अचगोंडा, पोलीस पाटील जीवा मड्डी, परशुराम कांबळे, संजय मड्डी, मधू पुजारी, गंबीर मड्डी, परमेश्वर गायकवाड, कविता लकबशेट्टी, मंगल शबादे, अशा वर्करा, आरती फुलारी, प्रियंक छत्री, सीमा चांबर, ग्रामपंचायत कर्मचारी नरसु फुलारी, विलास रोडगे व गावातील नागरिक मोट्या संकेने उपस्थित होते.

---

## जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी आयु.अमृत माने यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अचलेर/जय गायकवाड : लोहारा तालुक्यातील अचलेर येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती उत्सव कमिटी अध्यक्षपदी आयु. अमृत मळसिद्धा माने तर उपाध्यक्ष पदी आयु.अमृत लिंबाजी माने,सचिव शुभम डावरे, खजिनदार गोपाळ माने, सहखजिनदार शंभुगिरी कांबळे, सागर माने, जीवन डावरे,दर्शन सुरवसे, सुबोध लोखंडे, सुहास माने, रमाकांत हावळे, काशिनाथ गायकवाड, आलोक माने,पवन रणझुंजारे या सर्वांची दिनांक १४ एप्रिल रोजी अचलेर भीमनगर येथील विहारात माजी सरपंच आयु.प्रकाश लोखंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या बैठकीत एकमताने निवड करण्यात आली.

दिनांक २९ एप्रिल रोजी सायंकाळी ९ वाजता बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन व बुद्ध भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दिनांक ३० एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता बाबासाहेबांच्या प्रतिमेची गावातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.असे या बैठकीत ठरले आहे.

## वागदरी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने विविध ठिकाणी अभिवादन





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्ताने वागदरी तालुका तुळजापूर येथे विविध ठिकाणी अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. येथील भिम नगर मध्ये पंचशील बुद्ध विहार समाज मंदिराच्या प्रांगणामध्ये महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या निमित्ताने डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी वादगरीच्या वतीने अभिवादनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन सेवानिवृत्त पोलीस हवालदार संदिपान वाघमारे,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महादेव वाघमारे,पोलीस पाटील बाबुराव बिराजदार, सहशिक्षक तानाजी लोहार,सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब वाघमारे,पत्रकार किशोर धुमाळ,यांच्या शुभ हस्ते पूजन करून पोलीस पाटील बाबुराव बिराजदार यांच्या हस्ते निळा ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

त्यानंतर सामुदायिक रित्या बुद्ध वंदना घेण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन रिपाइं(आठवले) पक्षाचे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवाड यांनी केले तर अभार प्रदर्शन चंद्रकांत वाघमारे यानी केले.या प्रसंगी काही लाभार्थी ग्रामस्थाना राज्य परिवहन मंडळाचे प्रवाशी सवलतीचे स्मार्ट कार्ड वाटप करण्यात आले.यावेळी समस्त बौद्ध बांधव ग्रामस्थ युवा कार्यकर्ते महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच येथील ग्राम पंचायत कार्यालय वागदरी येथे ही भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने अभिवादन करण्यात आले

प्रारंभिक विद्यमान सरपंच सौ. तेजाबाई शिवाजी मिटकर उपसरपंच अंकुल वाघमारे,ग्रा.प. सदस्य ज्ञानेश्वर पाटील, अमोल पवार, मुक्ताबाई बिराजदार,सुरेखाताई यादव, मीनाक्षी बिराजदार सीआरपी विद्या बिराजदार, ज्येष्ठ कार्यकर्ते शिवाजी मिटकर गुरुजी, रोजगार सेवक रामसिंग परिहार,पोलीस पाटील बाबुराव बिराजदार,सामाजिक कार्यकर्ते एस.के.गायकवाड,ख किशोर धुमाळ, महादेव वाघमारे,ग्रामपंचायत कर्मचारी ओंकार चव्हाण सर्जेराव चव्हाण सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

### हजारो नागरिकांनी संविधान प्रास्ताविकाचे सामूहिकपणे केले वाचन

## बार्टीने समता रॅली द्वारे महामानवास केले अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संस्थेच्या वतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बार्टी मुख्यालयातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस समाजकल्याण आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दिपा मुधोळ -मुंडे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

बार्टी संस्थेच्या वतीने बार्टी ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्या पर्यंत समता रॅली काढण्यात आली.

या रॅलीचा शुभारंभ निळा ध्वज दाखवून मा आयुक्त यांनी केले.




रॅलीत विद्यार्थ्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, लोकराजा शाहू महाराज व इतर महापुरुषांची वेशभूषा परिधान करून समतेचा संदेश दिला.

या रॅलीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील नागरिकांना दिलेले संविधानिक अधिकार व कर्तव्य यांचे फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते.

रॅलीचा समारोप डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, समाज कल्याणच्या राज्यमंत्री श्रीमती माधुरीताई मिसाळ, यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आला.

यावेळी उपस्थित हजारो नागरिकांनी भारतीय संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन केले.

याप्रसंगी पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर , आमदार बापूसाहेब पठारे, चेतन तुपे,समाजकल्याणच्या आयुक्त तथा बार्टीच्या महासंचालक श्रीमती दीपा मुधोळ -मुंडे, प्रादेशिक उपायुक्त श्रीमती वंदना कोचुरे, विभागप्रमुख रविंद्र कदम, शुभांगी पाटील, लेखाधिकारी नितिन चव्हाण, कार्यालय अधिक्षक प्रज्ञा मोहिते यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

बार्टी मुख्यालयात यशोगाथा महामानवाची हा भीम गीताचा संगीतमय कार्यक्रम प्रा अविनाश नाईक व संच यांनी सादर करुन बाबासाहेबांच्या जीवनातील अनेक प्रसंगांना उजाळा दिला.

सुत्रसंचलन रामदास लोखंडे यांनी केले. आभार सुमेध थोरात यांनी मानले.

## मोहा येथे डॉ. बाबाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मोहा प्रतिनिधी/प्रविण कसबे : कळंब तालुक्यातील मोहा येथील भिमनगर येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार क्रांतीसुर्य भारतरत्न डॉ.बाबाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

प्रारंभी बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन ऑल इंडिया पँथरसेनेचे जिल्हा अध्यक्ष अशोक कसबे, अमर मडके युवक तालुकाध्यक्ष (अजित पवार गट) महेश नागटिळक, यांच्या हस्ते करण्यात आले. तर निळ्या झेंड्याचे ध्वजारोहण तानाजी कसबे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना आश्रुबा नागटिळक यांनी बाबासाहेबांचे कार्य व देशातील विविध जाती धर्मातील लोकांना संविधानाच्या माध्यमातून एका धाग्यात बांधल्याचे मत व्यक्त केले.

तसेच कनिष्क रमेश कसबे,(इंग्लिश मिडीयम) समाधान नाना कसबे, सिध्दांत माणिक कसबे, स्वप्निल सचिन कसबे या चिमुकल्यांनी बाबासाहेबांचा जीवन परिचय सांगत भारदस्त भाषणे केली.व या चिमुकल्यांना बाबासाहेब आंबेडकरांचे पुस्तके बक्षीस म्हणून आश्रुबा नागटिळक यांच्याकडून देण्यात आली.

यावेळी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी संचालक प्रविण कसबे, कोंडीबा कसबे, ग्रामपंचायत सदस्य महावीर कसबे, राहुल कसबे, मिलिंद कसबे, रणजित कसबे, फकीर कसबे, अरविंद हिरवे,किसन जाधव, आकाश कसबे व जयंती उत्सव समिती सदस्य तसेच महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबा कसबे यांनी केले.